आपल्या परिसरातील ताज्या घडामोडींसाठी
Deshdoot Media Group
आजच डाऊनलोड करा, देशदूतचे मोबाईल ॲप !
ॲप डाऊनलोड करण्यासाठी
क्यूआर कोड स्कॅन करा !

शिल्पकार विकासाचा...
देशदूत

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नाशिक | वर्ष ५५ । अंक ३०३ । मंगळवार, दि. ९ जुलै २०२४ । पाने १२ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

कालचे कांदा भाव

	आवक (क्विं.)	किमान	कमाल	सरासरी
लासलगांव	९६५४	१०५१	३१९०	२८५१
विंचूर	९५५०	१०००	३१००	२८५०
निफाड	५३९२	११११	३१०२	२८५०
सायखेडा	४०८०	१८००	३१५२	२९००
पिंपळगाव	२०४००	१८००	३२५२	२८५०

संपादकीय

आवाजाचे भान राखणे गरजेचे

पावसाळी महिने सणांची नांदी घेऊन येतात. अनेक सार्वजनिक सण या काळात साजरे होतात. ते धुमधडाक्यातच साजरे व्हावेत. तथापि सणांच्या दिवशी कानठळ्या बसवणारे स्पीकर आणि लेझर लाईट्सना बंदी घालावी अशी मागणी पुणेकरांनी मुख्यमंत्र्यांकडे नुकतीच केली. तशा आशयाचे निवेदन ज्येष्ठ नागरिकांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना पाठवले असल्याचे वृत्त माध्यमात प्रसिद्ध झाले आहे. वाढत्या प्रदूषणाने समाज त्रस्त आहे. त्याअर्थाने निवेदन पुणेकरांनी पाठवले असले तरी भावना मात्र सामाजिक आहेत असे म्हटल्यास वावगे ठरू नये. आवाजाचा दणदणाट कोणालाही त्रासदायकच ठरू शकतो. त्याचे दुष्परिणाम वेगळे सांगण्याची गरज नाही. ते लोक जाणून आहेत. अनेक कार्यक्रमांमध्ये डीजे वाजवण्याची पद्धत अलीकडच्या काळात रूढ झाली आहे. त्या आवाजाचा त्रास सर्वांनाच होतो. आवाजाची तीव्रता डेसिबलमध्ये मोजली जाते. माणसाचे कान साधारणपणे ७० डेसिबलपर्यंतचा आवाज ऐकू शकतात. डीजेच्या आवाजाची तीव्रता त्यापेक्षा कित्येक पटींनी जास्त असते. केवळ डीजेच नव्हे तर विशिष्ट डेसिबलपेक्षा कोणताही जास्त आवाज मानवी कान जायबंदी करू शकेल. कान किटवणाऱ्या आवाजात जास्त काळ राहणे अनेकार्थांनी धोकादायक ठरू शकते. सतत कानावर पडणाऱ्या मोठ्या आवाजामुळे कानाच्या आतील पेशी जायबंदी होतात. त्याचा ऐकण्याच्या क्षमतेवर विपरीत परिणाम होतो. लोक जितका जास्त काळ हा आवाज ऐकतील तितका धोकाही वाढू शकतो. काहींना तात्पुरते तर काहींना कायमचे बहिरेपण येऊ शकते. चक्कर येऊ शकते. माणसे चिडचिडी होऊ शकतात. हृदयाचे ठोके सुद्धा अनियमित होण्याचा धोका वैद्यकीय तज्ज्ञ सांगतात. लेझर लाईटचे देखील अनेक धोके असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे अनेकांना अंधत्व येण्याचा धोका व्यक्त केला जातो. इतके सगळे दुष्परिणाम माणसांना सहन करावे लागतात. ध्वनी प्रदूषण वाढते ते वेगळेच. तरीही अशा गोष्टींचा आग्रह का धरला जात असावा? माणसाच्या ऐकण्याच्या क्षमतेपेक्षा जास्त आवाज ऐकणे हिताचे नाही याचे भान सर्वांनी राखण्याची गरज आहे असे नेहमीच बोलले जाते. पण तसे घडताना मात्र का आढळत नसावे? केवळ यातच नव्हे तर एकूणच सामाजिक भान वाढण्याची गरज आहे.

पेपर फुटलेल्या केंद्रांची माहिती द्या

'नीट' प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाचे एनटीएला निर्देश

नवी दिल्ली । दि.८ प्रतिनिधी

'नीट' परीक्षेचा पेपर फुटला हे सर्वांनाच माहिती असून हा पेपर कशा पद्धतीने फुटला, यावर बऱ्याच गोष्टी अवलंबून आहेत.त्यामुळे एनटीएने पेपर फुटलेल्या केंद्रांची माहिती द्यावी. तसेच, ज्या विद्यार्थ्यांना लाभ मिळाला त्यांची माहिती १० जुलैपर्यंत द्यावी.जर या परीक्षेचा पेपर व्यापक स्वरुपात फुटला असेल, तर आम्हाला ही परीक्षा पुन्हा घेण्याचे निर्देश द्यावे लागतील, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

वैद्यकीय प्रवेश परीक्षा नीट-यूजी २०२४ शी संबंधित ३० हून अधिक याचिकांवर सोमवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली.परीक्षेतील गैरप्रकारांसोबतच परीक्षा नव्याने घेण्याच्या सूचना देणाऱ्या याचिकांचाही यात समावेश आहे. याशिवाय गुजरातमधील ५० हून अधिक उमेदवारांच्या स्वतंत्र याचिकेवरही सुनावणी झाली. यामध्ये केंद्र सरकार आणि एनटीएला परीक्षा रद्द करण्याचे निर्देश देण्याची विनंती पान १० वर

प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश

या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने एनटीएला प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले. 'नीट' परीक्षेचा पेपर केव्हा फुटला? पेपर फुटल्याची तारीख अणि प्रत्यक्ष परीक्षा यांच्यात नेमका किती कालावधी होता? यासंदर्भातील प्रतिज्ञापत्र पुढील सुनावणीपूर्वी सादर करा, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले. तसेच याप्रकरणी सीबीआयने आतापर्यंत काय कारवाई केली? याबाबतची माहिती सादर करण्याचे निर्देशही सर्वोच्च न्यायालयाने दिले.

पुढील सुनावणी गुरुवारी

या प्रकरणाची पुढील सुनावणी आता गुरुवारी ११ जुलै रोजी होणार आहे. त्यापूर्वी एनटीए आणि सीबीआयने अहवाल सादर करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

मुंबईत मुसळधार; नाशकात दडी

पाणी तुंबले; वाहतुकीचे तीन तेरा; रेल्वे ट्रॅकही बुडाले

मुंबई । दि.८ वृत्तसंस्था

रविवार व सोमवारी झालेल्या मुसळधार पावसाने महामुंबईतील सर्वच महापालिकांच्या क्षेत्रातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. ठिकठिकाणी पाणी तुंबल्याने रस्ते व रेल्वे वाहतुकीचे तीनतेरा वाजून नागरिकांचे प्रचंड हाल झाले. भारतीय हवामान खात्याने ९ जुलै रोजी सुद्धा अतिवृष्टी होणार असल्याचा इशारा दिला आहे.

मुंबईत रविवारी रात्रीपासून मुसळधार पाऊस सुरू असल्याने जागोजागी पाणी साचल्याचे दिसून आले. त्याचा परिणाम हा रस्ते वाहतूक आणि रेल्वे वाहतुकीवर झाला. मात्र, आता पाणी ओसरल्याने मध्य रेल्वे आणि पश्चिम रेल्वेची वाहतूक सुरू झाली आहे. कुर्ला आणि सायन दरम्यान साचलेले पाणी ओसरल्याने मध्य रेल्वेची वाहतूक पुन्हा सुरु झाली आहे. स्लो आणि फास्ट अशा दोन्ही मार्गावरील अप आणि डाऊन दिशेची वाहतूक सुरू झाली आहे. सीएसएमटी ते ठाणे, ठाणे ते कर्जत आणि कसारा अशी वाहतूक पुन्हा सुरू झाली आहे. तर पश्चिम रेल्वेची पान १० वर

पुढील तीन दिवस मुसळधारेचा अंदाज

पुणे । बंगालच्या उपसागरावर निर्माण झालेली हवेची द्रोणीय स्थिती, अरबी समुद्रावरून येणारे बाष्पयुक्त वारे, दक्षिण गुजरात ते केरळदरम्यान पसरलेला ट्रफ यामुळे राज्यात पावसाचा जोर वाढला असून, पुढील दोन ते तीन दिवस पुणे- साताऱ्यातील घाट क्षेत्र, सिंधुदुर्ग, रत्नागिरी जिल्ह्यात मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने सोमवारी वर्तविला.अरबी समुद्रावरून बाष्पयुक्त हवा जमिनीकडे वाहत आहे. याबरोबरच बंगालच्या उपसागरात हवेची द्रोणीय स्थिती आहे. यामुळे मान्सून सक्रिय असून, सोमवारी कोकण किनारपट्टी तसेच मध्य महाराष्ट्राच्या अनेक भागात धो-धो पाऊस बरसला. पावसाचा हा मारा पुढील काही दिवस कायम राहणार आहे.

पाणीबाणीची परिस्थिती; चिंतेत वाढ

नाशिक । दि.८ प्रतिनिधी

नाशिक जिल्ह्यात जून महिना कोरडा गेल्यानंतर जुलै महिन्याच्या एक आणि दोन तारखेला समाधानकारक पाऊस झाला. मात्र, त्यानंतर पुन्हा एकदा पावसाने दडी मारली असून आज गंगापूर धरणात केवळ १८.०७ टक्के पाणी साठा शिल्लक असल्याने नागरिकांमध्ये चिंता वाढलेली आहे.

नाशिक जिल्ह्यात अद्यापही समाधानकारक पाऊस नसल्याने शेतकरी चिंतेत आहेत. एकीकडे शेतकऱ्यांनी भात लागवडीसह इतर पिकांच्या लागवडीची तयारी केली आहे. मात्र, दुसरीकडे पाऊस जेमतेम असल्याने दुबार पेरणीचे संकट शेतकऱ्यांवर येण्याची शक्यता आहे. नाशिक जिल्ह्यातील एकूण २४ प्रकल्पात केवळ १२.२१ टक्के पाणीसाठा आहे. त्यामुळे नाशिक शहरासह सर्वच तालुके पावसासाठी आतुरलेले आहेत.

धरणे आटलेलीच

आजच्या जिल्हा प्रशासनाच्या अहवालानुसार कश्यपी ४.९७ टक्के, गौतमी गोदावरी १५.९० टक्के, पालखेड १४.४० टक्के, दारणा २४.१६ टक्के, भावली २९.४३ टक्के, वालदेवी ८.७४ टक्के, मुकणे ७.३८ टक्के, नांदूरमध्यमेश्वर १०० टक्के, चणकापुर ४.८२ टक्के, हरणबारी ८.५८ टक्के, केळझर ०.७० टक्के, गिरणा ११.७५ टक्के तर पावसाचा जून महिना होऊनही ओझरखेड, पुणेगाव, तिसगाव, माणिकपुंज धरणात शून्य टक्के पाणीसाठा आहे.

अजूनही टँकरद्वारे पाणीपुरवठा

नाशिक जिल्ह्यात जुलैच्या सुरुवातीला पावसाने चांगली हजेरी लावली. मात्र, जिल्ह्याच्या लगत असलेल्या जिल्ह्यांमध्ये काल सकाळपासून मुसळधार सुरू असताना नाशिक जिल्ह्यात पावसाची उघडीप होती. जिल्ह्यातील १५ तालुक्यांपैकी आठ तालुक्यांमध्ये असलेल्या ९२९ गाव वाड्यावर २२५ टँकरच्या माध्यमातून ५४२ टँकर फेर्यांद्वारे चार लाख ४१ हजार ४८९ नागरिकांची तहान भागवली जात आहे. पान १० वर

दहशतवादी हल्ल्यात चार जवान शहीद

श्रीनगर । दि.८ वृत्तसंस्था

जम्मूच्या कठुआमध्ये लष्कराच्या ताफ्यावर दहशतवाद्यांनी हल्ला केला असून त्यात चार जवान शहीद झाले आहेत.

मछेडी परिसरात दहशतवाद्यांनी लष्कराच्या वाहनावर ग्रेनेड फेकून गोळीबार केला. या हल्ल्यात काही जवान जखमी झाले होते, त्यातील चार जवानांना वीरमरण आले असून, इतर चौघांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या हल्ल्यानंतर दहशतवाद्यांच्या शोधासाठी पथकेही रवाना झाली आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, लष्कराचे वाहन जात होते, यावेळी अचानक टेकडीवर लपलेल्या दहशतवाद्यांनी ग्रेनेड फेकले आणि गोळीबार केला. यानंतर सुरक्षा दलानेही चोख प्रत्युत्तर दिले. सुरुवातीला या घटनेत दोन जवान जखमी झाल्याची माहिती समोर आली होती, पण आता यात चार जवान शहीद झाल्याची माहिती आहे.

दरम्यान, मागील काही दिवसांपासून जम्मू-काश्मीरमधील दहशतवादी हल्ल्यात मोठी वाढ झाली आहे. रविवारी राजौरी भागातही दहशतवाद्यांनी लष्कराच्या ताफ्यावर हल्ला केला होता. या हल्ल्यालाही लष्कराने चोख प्रत्युत्तर दिले होते. मात्र, दहशतवाही येथून पळून जाण्यात यशस्वी ठरले होते. या हल्ल्यात एक जवान जखमी झाला होता.

◉ लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सोमवारी मणिपूरमधील जिरीबाम आणि चुराचंदपूर जिल्ह्यातील मदत शिबिरांना भेट दिली आणि तेथे राहणाऱ्या लोकांशी संवाद साधला. तसेच, त्यांच्या समस्या ऐकून घेतल्या.या दौऱ्यात त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर निशाणा साधला. मणिपूरमध्ये जे घडत आहे, ते देशात कुठेही पाहिलेले नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मणिपूरला यायला हवे होते असे म्हणत मोदींनी मणिपूरमध्ये येऊन येथील लोकांना धीर द्यावा, अशी विनंती सुद्धा राहुल गांधी यांनी केली.

दोन प्रश्न बाद ; मोफत मिळणार गुण

शहर पोलीस भरती : प्रश्न आणि उत्तरांच्या पर्यायात संदिग्धता

नाशिक। दि.८ प्रतिनिधी

रविवारी पार पडलेल्या शहर पोलीस भरतीच्या लेखी परीक्षेत दोन प्रश्न हे उत्तरांच्या पर्यायातील संदिग्धता वाढवणारे असल्याचे अधोरेखित झाले आहे. त्यामुळे या प्रश्नांचे गुण उमेदवारांना दिले जाणार असल्याचे आयुक्तालयाने स्पष्ट केले आहे. तर, सोमवारी रात्री उशिरापर्यंत पेपर तपासणी व गुणतालिका तयार करण्याचे कामकाज सुरु होते.

नाशिक शहर पोलीस शिपाई पदाच्या भरतीप्रक्रियेतील लेखी परीक्षेत संदिग्ध पर्यायांमुळे दोन प्रश्न बाद करावे लागले आहेत. परीक्षेच्या अंतिम उत्तरतालिकेत त्यासंदर्भात माहिती समोर आली असून 'कुंभमेळा किती वर्षांनी भरतो' या प्रश्नाकरीता बारा, सहा, तीन व नऊ असे चार पर्याय देण्यात आले होते. मात्र, प्रश्नात भारतात अथवा महाराष्ट्रात असा उल्लेख नसल्याने बारा व तीन हे दोन्ही पर्याय योग्य ठरले. परिणामी, आयुक्तालयाने हा प्रश्न बाद करुन उमेदवारांना आणखीन एक गुण देण्याचा निर्णय घेतला आहे. पोलीस भरतीची लेखी परीक्षा रविवारी घेण्यात आली. त्यानुसार नाशिक शहरातील ११८ रिक्त पदासांठी एक हजार १९७ उमेदवारांची लेखी परीक्षेसाठी निवड झाली. त्यापैकी १५ जणांनी दांडी मारली. या परीक्षेत बुद्धिमत्ता विषयातील प्रत्येकी एक प्रश्न रविवारी (दि. ७) सायंकाळी जारी झालेल्या उत्तरतालिकेत बाद करण्यात आला. तर सोमवारी (दि. ८) दुपारी दोन वाजेपर्यंत संबंधित उत्तरतालिकेवर हरकती नोंद झाल्या. त्यावेळी 'कुंभमेळा किती वर्षांनी भरतो'या प्रश्नासाठी पहिल्या उत्तरतालिकेत बारा हा पर्याय योग्य दाखविल्याने आक्षेप घेण्यात आला. प्रश्नात कुंभमेळा कुठे किती वर्षांनी भरतो, याबाबत स्पष्टता नसल्याचा दावा उमेदवारांनी केला. आयुक्तालयानेही त्यासंदर्भात पडताळणी केल्यानंतर सुधारित उत्तरतालिका जारी केली. त्यामध्ये संबंधित प्रश्नही बाद करण्यात आला. दोन प्रश्न बाद झाले असून संबंधित प्रश्न सोडविलेल्या उमेदवारांना दोन गुण मिळणार आहेत.

असा आहे विषय

कुंभमेळा हा ठराविक आवर्तन काळानुसार भारतातील पवित्र नद्यांच्या तीर्थक्षेत्री दर तीन वर्षांनंतर एकदा या स्वरुपात बारा वर्षांत प्रयागराज, उज्जैन, नाशिक (गोदावरी व त्र्यंबकेश्वर), हरिद्वार या चार स्वतंत्र तीर्थक्षेत्री भरतो. त्यामुळे 'कुंभमेळा दर --- वर्षांनी भरतो' या प्रश्नाकरीता भारतात प्रत्येक तीन वर्षांनी तर नाशिकमध्ये अथवा संबंधित तीर्थक्षेत्री प्रत्येकी बारा वर्षांनी अशी दोन्ही पर्याय योग्य ठरतात. त्यामुळे प्रश्न बाद करण्यात आला आहे.

मुलींना मिळणार मोफत शिक्षण

शासन निर्णय जारी; अनाथ मुलांनाही लाभ

मुंबई । दि.८ वृत्तसंस्था

व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग तसेच, इतर मागास प्रवर्गातील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्कामध्ये ५० टक्के ऐवजी १०० टक्के शिक्षण शुल्क संदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. या निर्णयामुळे राज्यातील मुलींना मोफत उच्च शिक्षणाचा लाभ मिळणार आहे अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

नवीन शैक्षणिक धोरणानुसार व्यावसायिक शिक्षणातील मुलींचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने व मुलींना समप्रमाणात शिक्षणाच्या व्यापक संधी प्राप्त व्हाव्या, तसेच महिला सक्षमीकरणांतर्गत आर्थिक पाठबळाअभावी व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेण्यापासून राज्यातील मुली उच्च शिक्षणापासून वंचित राहू नयेत, यासाठी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांनी मुलींना उच्च शिक्षण मोफत देण्याची घोषणा केली होती. या निर्णयाला मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली असून सोमवारी यासंदर्भतील शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. पान १० वर

प्रक्रियायुक्त भाजीपाला निर्यातीतून ६.५ हजार कोटी

लासलगाव। दि.८ वार्ताहर

मागील आर्थिक वर्षात २०२३-२४ मध्ये भारतातून ५ लाख ३७ हजार मेट्रिक टन प्रक्रिया केलेला भाजीपाला देशातील निर्यातीपैकी सर्वाधिक प्रमाणात यूएसए, फिलिपाइन्स, युके, थायलंड आणि युनायटेड अरब देशात निर्यात झाला आहे. त्या निर्यातीतून देशाला तब्बल साडेसहा हजार कोटी रुपयांचे परकीय चलन मिळाल्याचे अपेडाच्या आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे.

भाजीपाल्यापासून प्रक्रियायुक्त पदार्थांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेऊन त्यांची निर्यात वाढवून परकीय चलन मिळविण्यास वाव आहे. त्यामुळे शेतमाल प्रक्रिया उद्योगांना चालना व रोजगारनिर्मिती होऊ शकेल. भाज्या पचनास सोप्या आणि हलक्या असल्याने रोजच्या आहारात त्यांना खूप महत्त्व आहे. विविध आजार पान १० वर

लागवड आणि प्रक्रिया क्षेत्र

कच्च्या भाज्या सामान्यत: शेतात पिकवल्या जातात आणि प्रामुख्याने महाराष्ट्र, जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेशातील डोंगराळ प्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेश, आसाम, मध्य प्रदेश, राजस्थान या राज्यांमध्ये पिकतात. पंजाब, त्रिपुरा, पश्चिम बंगाल आणि ओडिशा आदी राज्यात ही लागवड मोठ्या प्रमाणात होते.

मागील पाच वर्षातील निर्यात आलेख

सन २०१९-२०	२७६० कोटी
सन २०२०-२१	३७१८ कोटी
सन २०२१-२२	३९८६ कोटी
सन २०२२-२३	४९८७ कोटी
सन २०२३-२४	६५२३ कोटी